# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
(शिक्षण विभाग)

जा.क्र.२०५/शि.वि./२०१५ दि.१०/०४/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- म.न.पा. शाळेत सुरू असणारा संगणक प्रकल्प बंद करण्यात आल्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मागील ६ वर्षांपासून अनुक्रमे १. M/s Computer Business Management Ltd. and 2. M/s Everonn Education Ltd या संगणक संस्थांमार्फत सुरू असलेला संगणक प्रकल्प, प्रकल्पाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे बंद करण्यात येत आहे.

आपले शाळेत M/s Everonn Education Ltd. यांची संगणक प्रयोगशाळा असल्यास त्यांचेकडील कार्य त्यांचे विनंतीनुसार दि.०१.०४.२०१५ पासून बंद करण्यात आलेले आहे. व M/s Computer Business Management Ltd. यांची संगणक प्रयोगशाळा असल्यास त्यांचेकडील कार्य दि.१६.०४.२०१५ पासून बंद करण्यात आलेले आहे. यामुळे प्रस्तुत संगणक संस्थांचे शिक्षक उपरोक्त कालावधीपासून आपले शाळेत येत नाहीत/येणार नाहीत, याची नोंद घ्यावी. सोबत संगणक संस्थांकडून प्रकल्पाचे प्रगती अहवालास्तव सादर करण्यात येणारे Checklist वर सुध्दा प्रस्तुत कालावधी पर्यंतच वस्तुनिष्ठतेप्रमाणे स्वाक्षरी करावी.

संगणक प्रकल्प बंद होत असला तरी फक्त संगणक शिक्षक शाळेत येणार नाहीत. संगणक संस्था निविदा प्रक्रियेव्दारा नविन सेवा प्रदाता नियुक्त होईपर्यंत, त्यांच्या संगणक प्रयोगशाळा शाळेतच वापराकरीता उपलब्ध करून देणार आहेत, यास्तव संगणक प्रयोगशाळेतील साहित्याची मोजणी करून त्याचा ताबा तात्पुरत्या स्वरूपात शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सोपविण्यात येईल. यामुळे विभागाव्दारा पुरविण्यात आलेल्या इंटरनेट डोंगल कनेक्शन व्दारा दैनंदिन ऑनलाईन परिपत्रके काढण्यास अडचण भासणार नाही व प्रस्तुत परिपत्रके पाहण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांवर व शिक्षकांवर राहील.

याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण भासल्यास श्री.विनय बगले यांचेशी मो.क्र.९८२३०२३२६० वर संपर्क साधावा.

(मा.उपायुक्त यांचे मंजुरी आदेशान्वये)

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रतिलिपी,

१. मा.उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
२. सहा.आयुक्त, झोन क्र.१ ते १०, म.न.पा., नागपूर.
३. शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १०, म.न.पा., नागपूर.
४. Project Manager, M/s Computer Business Management Ltd.
५. Project Manager, M/s Everonn Education Ltd